# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
## दापोली, जि. रत्नागिरी

जा.क्र. डॉबासाकोकृवि/आस्था/अ–३/५२४/२०१७,                    दिनांक – 17 JUL 2017

**प्रस्तावना :-**

काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, रोहा येथील सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजी (अ.क्र. १३ ते १८) जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीवर एम.एस्सी., काढणी पश्चात व्यवस्थापन विषयाच्या विद्यार्थ्यांनी पद भरतीबाबत तक्रार केल्यामुळे सहाय्यक प्राध्यापक, काढणी पश्चात व्यवस्थापन विषयाच्या पद भरतीस मा. मंत्री (कृषि) तथा अध्यक्ष, कृषि परिषद यांनी पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती दिली होती. तसेच याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार काढणी पश्चात व्यवस्थापन विषयांच्या मुलाखती स्थगित करण्यात आलेल्या आहेत. कृषि परिषदेचे आदेश क्र. मकृप/आस्था–२/कापव्य– डॉबासाकोकृवि, दापोली /चौकशी/३३१६/२०१६/९१२, दिनांक २५ एप्रिल, २०१६ अन्वये स्थापन केलेल्या चौकशी समितीने काढणी पश्चात व्यवस्थापन या विषयाची शैक्षिणिक अर्हता (विषय) महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम, १९९० च्या परिनियम ७७(१)(प) मधील तरतुदीनुसार विद्या परिषद आणि कार्यकारी परिषदेच्या मान्येतेने विहित करुन निवड प्रक्रिया नव्याने राबवावी, असे निर्देश दिले.

समितीच्या शिफारशी नुसार काढणी पश्चात व्यवस्थापन या विषयांच्या सहाय्यक प्राध्यापक पदासाठीचे पात्रता निकषांना (विषयांना) दिनांक २४/११/२०१६ रोजी संपन्न झालेल्या १३० व्या विद्या परिषदेच्या बैठकीमधील ठराव क्र. १३०/०९ अन्वये मान्यता देण्यात येवून कार्यकारी परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. त्यानुसार दिनांक ३०/११/२०१६ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी परिषदेच्या २४२ व्या सभेतील ठराव क्र. २४२/१७ नुसार काढणी पश्चात व्यवस्थापन विभागाचे विषय निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे विद्यापीठाने प्रसिध्द केलेली जाहिरात क्र. BSKKV/EST/A-I/9693/of 2014, Dated 24th November, 2014 मधील काढणी पश्चात व्यवस्थापन विषयाच्या अ.क्र. १३ ते १८ येथील पदांची जाहिरात रद्द करण्याची बाब विद्यापीठ प्रशासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालील अधिसुचना निर्गमित करण्यात येत आहे.

# अधिसूचना

मा. कुलगुरु महोदय यांनी मान्यता दिल्यानुसार विद्यापीठ जाहिरात क्र. BSKKV/EST/A-I/9693/of 2014, Dated 24th November, 2014 अन्वये काढणी पश्चात व्यवस्थापन विषयाच्या अ.क्र. १३ ते १८ नुसार सहाय्यक प्राध्यापक व तत्सम संवर्गाची प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात कृषि परिषदेने नियुक्ती केलेल्या समितीने निर्देशित केल्याप्रमाणे सुधारीत विषय निश्चित करुन भरण्याबाबत शिफारस केल्याने सदर शिफारशीस अधीन राहून रद्द करण्यात येत आहे.

(सही) 17/7

कुलसचिव,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी.

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

१. संचालक, विस्तार शिक्षण / संशोधन संचालक / शिक्षण संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
३. विद्यापीठ संकेतस्थळ www.dbskkv.org